| | |
|---|---|
| MHNS160011092024 | दाखल दिनांक : २७/०६/२०२४<br>नोंदणी दिनांक : २७/०६/२०२४<br>निकाल दिनांक: २४/०३/२०२६<br>कालावधी : ०१व. ०८ म. २७ दि. |

**FORM NO. XXXII**
**PART 'A'**
**(Title Page of Judgment)**

**चांदवड येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**ता. चादंवड, जि. नाशिक**
**(पीठासीन न्यायाधीश: वृषाली दी.सुंगारे)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४५९/२०२४.** **निशाणी क्र.२२**

| | |
|---|---|
| | प्रथम खबरेचा तपशील –<br>गुन्हा क्रमांक – १५४/२०२३, दि.१३.०७.२०२३ |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासनतर्फे,<br>**शांताराम रुपजी माळी, पो. ना.**<br>वडनेर भैरव पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण,<br>ता. चांदवड जि. नाशिक |
| फिर्यादीकरीता विधिज्ञ | सहा. सरकारी अभियोक्ता,<br>श्री. आर.एम.वाळके, |
| आरोपी | **शंकर शिवाजी गांगुर्डे,**<br>वय ५५ वर्षे, |

| | |
|---|---|
| | रा. सोग्रस, ता. चांदवड, जि. नाशिक. |
| आरोपीकरीता विधिज्ञ | श्री. एस. डी. मांदळे, विधीज्ञ |

**PART 'B'**

**[Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual]**

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | १३/०७/२०२३ |
| प्रथम खबरीचा दिनांक | १३/०७/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २७/०६/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २७/०६/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक | २४/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक | – निर्दोष मुक्तता |

## <u>आरोपीचा तपशिल</u>

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | निर्दोष मुक्तता किंवा शिक्षा | शिक्षे संदर्भात | फिर्यादी खटला चालु असताना भोगलेला तुरुंगवास, फौ.प्र.संहिताचे कलम ४२८ च्या पुर्ततेकामी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शंकर शिवाजी गांगुर्डे | फौ.प्र.सं. कलम ४१(१) (अ)प्रमाणे नोटीस | २७/०६/२०२४ | मुंबई दारुबंदी अधिनियमचे कलम ६५ (अ) (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |

**PART 'C'**
**[Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual]**

## सरकारपक्षाच्या / बचावपक्षाच्या / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारपक्षाचे साक्षीदार

| नंबर | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| पीडब्लु १ | ज्ञानेश्वर अनिल भोगे | पंच साक्षीदार, नि.क्र.१९ |

### ब. बचावपक्षाचे साक्षीदार

| नंबर | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| नंबर | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

## सरकारपक्षाचे / बचावपक्षाचे / न्यायालयाचे दस्तऐवज क्रमांक

### अ. सरकारपक्षाचे दस्तऐवज

| नंबर | दस्ताचा तपशिल | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | पंचनाम्यावरील सहीस | नि.क्र.२० |

**ब. बचावपक्षाचे दस्तऐवज**

| नंबर | दस्ताचा तपशिल | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयीन दस्तऐवज**

| नंबर | दस्ताचा तपशिल | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मटेरीअल ऑबजेक्ट**

| नंबर | वस्तुचे वर्णन | तपशिल |
|---|---|---|
| १ | ४९०/– रुपये किंमतीच्या देशी दारु प्रिंस संत्राच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या | एम. आर क्र. ५९/२०२३ |
| २ | एक बजाज बॉक्सर मोटारसायकल क्र. एम.एच.१५, ए.एल. ४६८५ | एम. आर. क्र. ५९/२०२३ |

**न्यायनिर्णय**

सरकारी पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :.

१. फिर्यादी यांनी दि.१३.०७.२०२३ रोजी सरकारपक्षातर्फे फिर्याद दिली की, दिनांक १३.०७.२०२३ रोजी सकाळी ९:३० वाजता ते तसेच

पो.उ.नि. आर. के. त्रिभूवन, स.पो.उ.नि. पगारे, पो.ना. सानप असे वडाळी भोई पोलीस दूरक्षेत्र येथे हजर असतांना स.पो.नि. भामरे यांनी त्यांच्या फोनद्वारे माहिती दिली की, सोग्रस फाटा येथे इसम नामे शंकर शिवाजी गांगुर्डे हा देशी दारुची चोरट्या रितीने विक्री व वाहतुक करत आहे. सदर ठिकाणी जावून तुम्ही खात्री करुन कारवाई करा असे आदेश दिल्याने, फिर्यादी व उपस्थित पोलीस कर्मचारी, तसेच पो.उ.नि. त्रिभूवन यांनी पंचनाम्यातील दोन पंचांना बोलावून घेवून त्यांना बातमीप्रमाणे माहिती समजावून सांगितली. तशी पंचांनी सहमती दर्शविल्याने फिर्यादी, पोलीस स्टाफ व पंच असे खाजगी वाहनाने वडाळी भोई येथून मुंबई–आग्रा रोड मार्गे जावून सोग्रस फाट्याजवळ त्यांचे खाजगी वाहन उभे करुन पायीमार्गे बातमी मिळालेल्या ठिकाणी जावून खात्री केली असता तेथे एक इसम मोटार सायकलवरबसून चांदवड बाजूकडून सोग्रस फाट्याजवळ वाहतुक करत असतांना दिसला. तो इसम सोग्रस फाट्याजवळ थांबला असता फिर्यादी, पोलीस स्टाफ व पंचांची बातमीप्रमाणे खात्री झाल्याने त्यांनी त्या इसमावर सकाळी १०:०० वाजता छापा टाकला. त्यावेळी पो.उ.नि. त्रिभूवन यांनी पोलीस कर्मचाऱ्यांची व पंचांची ओळख करुन देवून त्यांनी त्या इसमास झडतीचा उद्देश समजावून सांगून सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शंकर शिवाजी गांगुर्डे रा. सोग्रस असे सांगितले. त्या इसमास फिर्यादी, पोलीस स्टाफ व

पंच यांनी ओळख सांगून पो.ना. सानप यांनी झडती घेतली असता त्या इसमाच्या ताब्यात ४९००/- रुपये किंमतीच्या देशी दारु प्रिंस संत्राच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व २०,०००/- रुपये किंमतीची बजाज बॉक्सर मोटारसायकल क्र. एम.एच.१५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्ह्याचा मुद्देमाल मिळून आला. म्हणून सदरची फिर्याद फिर्यादीने वडनेर भैरव पोलीस स्टेशनला आरोपीविरुद्ध दिली.

२. फिर्यादिने दिलेल्या फिर्यादवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्र.१५४/२०२३ मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ) (ई) अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार ए. पी. ब्राम्हणे यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. आरोपीला अटक करुन तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर, मुंबई दारु प्रतिबंध अधिनियम कलम ६५ अ, ई अन्वये दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेत समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल न केल्याने त्याचे विरुध्द खटला चालविण्यात आला.

४. सरकारीपक्षाने आपला खटला शाबीत करण्यासाठी केवळ एका साक्षीदाराची साक्ष दप्तरी नोंदविलेली आहे. त्यानंतर उर्वरित साक्षीदारांची साक्ष

नोंदवण्यासाठी सरकारी पक्षास संधी देऊन देखील सरकारी पक्षाने त्यांची साक्ष नोंदविलेली नाही. उर्वरित साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यासाठी वारंवार न्यायालयातील समन्स/वॉरंट काढण्यात आले. मात्र अनेक प्रयत्न करुनही ते साक्षीदार साक्ष देण्यासाठी न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे निशाणी १ वर आदेश पारित करुन सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम ३१३ नुसार बयाण निशाणी २१ वर नोंदविण्यात आले.

५. सदरचा खटला निकाली काढत असताना माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. खालील चर्चित कारणास्तव मी त्या प्रश्नांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर देत आहे.

| <u>अनु.क्र.</u> | <u>प्रश्न</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | सरकारी पक्ष हे सिद्ध करतो काय की, दि. १३.०७.२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास सोग्रस फाटा, ता. चांदवड येथे आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना, बेकायदा प्रिंस संत्रा देशी दारुच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्हाचा मुद्देमाल स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला व त्याद्वारे | **नकारार्थी.** |

मुं.प्रो.का. कलम ६५ (अ) (ई) अन्वये गुन्हा केल्याचे सिद्ध केले का?

२ आदेश काय ? **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.**

**कारणमिंमासा**

६. सरकारीपक्षातर्फे विद्वान सहा.अभियोक्ता श्री. आर. एम. वाळके व आरोपीच्या वतीने विद्वान अधिवक्ता श्री. एस. डी. मांदळे यांचा युक्तीवाद श्रवण केला.

**मुद्दा क्र १ :–**

७. सरकारपक्षातर्फे तपासण्यात आलेले एकमेव पंच साक्षीदार क्र.१ ज्ञानेश्वर अनिल भोगे हे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामाचे पंच साक्षीदार असुन त्यांनी सरकारी पक्षास सहकार्य न केल्याने सरकारीपक्षास भारतीय पुरावा कायदा, कलम १५४ अन्वये उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची संधी देवुन देखील खटल्यास पूरक ठरेल अशी कोणतीही कबुली दप्तरी मिळून आली नाही.

८. सरकारी पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी दि. १३.०७.२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास सोग्रस फाटा, ता. चांदवड येथे आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना, बेकायदा प्रिंस संत्रा देशी दारुच्या

१४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्हाचा मुद्देमाल स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला. दप्तरी असा कोणताही पुरावा नाही की, घटनास्थळ हे आरोपीच्या मालकीचे आहे किंवा ते त्याच्या ताब्यात आहे. तसेच घटनेदिवशी आरोपी प्रिंस संत्रा देशी दारुच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्हाचा माल घेऊन होता हे सरकारी पक्षास सिद्ध करता आले नाही. संधी देवुनही सरकारी पक्षाने फिर्यादी व इतर साक्षीदार न तपासल्याने सरकारीपक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. त्यामुळे, फिर्याद यथायोग्यरित्या शाबीत झालेली नाही. त्यामुळे, परिपोषक पुराव्या अभावी त्यांच्या कथनांवर विसंबुन राहणे विधीसंगत होणार नाही

९. सरकारी पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी दि. १३.०७.२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास सोग्रस फाटा, ता. चांदवड येथे आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना, बेकायदा प्रिंस संत्रा देशी दारुच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्हाचा मुद्देमाल स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला. तपासी यंत्रणेने व पर्यायाने सरकारी पक्षाने

अभिपटलावर घटनास्थळ हे आरोपीच्या मालकीचे किंवा ताब्यात असल्याचे दाखवणारे कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत. तसेच घटनास्थळ हे लोकवस्तीतील ठिकाण असूनही सरकारी पक्षाने घटनास्थळाच्या आजूबाजूला राहणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवली नाही. त्यामुळे आरोपी प्रिंस संत्रा देशी दारुच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ असा प्रोहिबीशन गुन्हाचा माल घेऊन होता हे सरकारी पक्ष निर्विवादपणे सिद्ध करु शकला नाही. सरकारी पक्षाला वारंवार संधी देऊनही इतर आवश्यक पक्षकारांची साक्ष नोंदवलेली नाही. घटनास्थळ आरोपीच्या मालकीचे असल्याचे व आरोपी घटनास्थळी विनापरवाना अवैधरितीने प्रिंस संत्रा देशी दारु विक्री करत होता हे बघणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष सरकारी पक्षाने नोंदवलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतकामी कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. तसेच पंच साक्षीदारानेही सरकारी पक्षाला कोणतेही सहकार्य केले नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा व पर्यायाने सदरचा गुन्हा आरोपीने केल्याचे सरकारी पक्षाला सिद्ध करता आले नाही.

१०. सदर संचिकेचे अवलोकन केले असता, रासायनिक विश्लेषकाचा अहवाल दप्तरी दाखल आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल आरोपीच्या

ताब्यातून जप्त झाला हे कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराकडून सरकारी पक्षाला सिद्ध करता आले नाही. सरकारी पक्षाने ज्या पंच साक्षीदाराची साक्षीदाराची साक्ष नोंदवली. त्याने त्याच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा झाल्याचे स्पष्ट शब्दात नाकारले आहे. घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिद्ध झाला नाही. त्यामुळे जरी रासायनिक विश्लेषकाचा अहवाल अभिपटलावर असला तरी त्यामुळे आरोपीनेच सदरचा गुन्हा केला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, जप्त केलेला मुद्देमाल दारू होती हे सरकारी पक्ष सिध्द करु शकले नाही.

११. जरी कायद्याची अशी स्थिर परिस्थिती आहे की, एका साक्षीदाराचा पुरावा हा देखील आरोपीस शिक्षा देण्यास पुरेसा असतो परंतू त्यासाठी सदर साक्षीदाराचा पुरावा हा सत्यतेची कसोटी पूर्ण करणारा असावा लागतो. परंतू वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांचा पुरावा सदरची कसोटी पूर्ण करण्यास अपुरा आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता सरकारीपक्ष आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यास अयशस्वी ठरले आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.०२ :–**

१२. दप्तरी आलेल्या पुराव्यावरुन घटनेदिवशी आरोपी त्याच्या ताब्यात

प्रिंस संत्रा देशी दारुच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या व एक बजाज बॉक्सर दुचाकी क्र. एम. एच. १५, ए.एल. ४६८५ घेऊन होता व आरोपीनेच सदरचा गुन्हा केला हे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष पूर्णतः अयशस्वी ठरलेला आहे. त्यामुळे, फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबित झालेला नाही. सबब, संशयाचा फायदा आरोपीस देऊन मुद्दा क्र.२ चे निष्कर्षार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आ दे श ::**

१. आरोपी **शंकर शिवाजी गांगुर्डे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता,कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, कलम ६५(अ) (ई) मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीनकतबे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. अपिल कालावधीनंतर खटल्यातील जप्त विनापरवाना देशी दारु प्रिंस संत्राच्या १४० बाटल्या प्रत्येकी ९० मिलीच्या या दारु प्रतिबंध अधिनियम कलम ९८ अन्वये विल्हेवाट लावण्याकामी राज्य उत्पादन शुल्क विभाग, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात यावा.

ii) एक बजाज बॉक्सर मोटारसायकल क्र. एम.एच.१५, ए.एल. ४६८५ ही मुळ मालकास कायद्यानुसार परत करण्यात यावी व ती यापूर्वीच मागणीदाराला दिलेली असल्यास त्याचा ताबा अपिल कालावधीनंतर मागणीदाराकडे कायम करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) नुसार रक्कम रुपये १५०००/– चा जामिनकतबा व जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.04.04 20:28:16 +0530

दिनांक – २४.०३.२०२६

ठिकाण – चांदवड.

(वृषाली दी. सुंगारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
क.स्तर, चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***एस. आर. हटकर,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क.स्तर, चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | २४/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०४/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०४/०४/२०२६ |